# गाऊट (अंगुलीवात)

## अंगुलीवात म्हणजे काय?

अंगुलीवात या आजारामुळे सांध्यामध्ये असहय वेदना होतात आणि सांधे कडक होतात. अंगुलीवाताने अचानक वेदना उद्भावतात आणि आपणहून थांबतात. व पुन्हा कालांतराने सुरु होतात व तीव्र वेदनांमुळे कायमस्वरुपी व्यंग सांध्यामध्ये येते . सांध्यामध्ये युरिक ॲसिड साठले की अंगुलीवात (गाऊट) हा आजार होतो.

## धोक्याची कारणे-




- कुटुंबात अंगुलीवात असणे
- मूत्रपिंडाचे आजार किंवा मूत्रपिंडाच्या कामात समस्या
- प्युरिन म्हणजे नायट्रोजनयुक्त पदार्थांचे सेवन उदा. लाल मांस
- मद्यपान किंवा तंबाखू सेवन
- लघविचे प्रमाण वाढवणारी औषधे (वॉटर पिल्स किंवा ॲस्प्रीन)
- वैद्यकीय समस्या जसे मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा उच्च कोलेस्टेरॉल

## चिन्हे आणि लक्षणे-

- सांधे गरम वाटतात आणिं अतिशय संवेदनशील होतात स्पर्श सहन होत नाही. बाधित सांध्यात आणि सभोवताली सूज येते.
- लाल, चकाकणारी त्वचा, बाधित सांध्याजवळ दिसते.
- सूज गेल्यावर त्वचा सोलल्यासारखी दिसते . खाज येणारी आणि ओरखडलेली दिसते.

## निदान-

- युरिक ॲसिडचे प्रमाण मोजण्यासाठी रक्त तपासणी केली जाते , अशी रक्त तपासणी अनेकवेळा करावी लागते.
- दुख-या सांध्यापासूनचे द्राव तपासणीसाठी काढले जातात. या द्रावातील युरिक ॲसिडचे खडे तपासले जातात.

## उपचार-

- स्टिरॉईड नसलेली, दाह कमी करणारी वेदनाशामक औषधे वापरली जातात जसे आयबुप्रोफेन यामुळे सूज, वेदना आणि ताप कमी होण्यास मदत होते.
- अंगुलीवातावरील औषधांनी सूज व वेदना कमी होतात पुन्हा या वाताचा त्रास होऊ नये यासाठीही दिली जातात.
- अंगुलीवाताचा त्रास सुरु असतांना स्टेरॉईड औषधे दिल्यास दाह आणि सांध्यातील कडकपणा व वेदना कमी होण्यास मदत होते.
- युरिक ॲसिडची निर्मीती कमी व्हावी यासाठी किंवा लघवीतून अधिकाधिक युरिक ॲसिड फेकले जावे यासाठी औषधे दिली जातात.
- सांध्यामध्ये वेदना आणि संसंर्ग निर्माण करणा-या युरिक ॲसिडचे खडे /स्फटिक जमा झाल्यास सांध्यातील हाडाचे शस्त्रक्रिया करुन उपचार करतात. शरीरातील इतर ठिकाणचे हाड काढून बाधित हाड बदलले जाते.

### रुग्ण समुपदेशन-

- दुख-या सांध्यांना आराम द्यावा त्याने झीज भरुन येईल
- बर्फामुळे सूज/ दाह वेदना कमी होतात म्हणून बर्फाचा शेक द्यावा.
- लाल मटण खाऊ नये. त्यामध्ये मांस मासे ॲस्परॅगस, पालक, फुलकोबी आणि काही प्रकारच्या शेंगा खाऊ नये.
- पाणी प्यायल्याने शरीरातील युरिक ॲसिड बाहेर फेकले जाते
- वजन कमी केल्यानेही युरिक ॲसिड कमी होते.
- मद्यपान शक्यतो टाळावे. मद्यपानाने अंगुलीवात होऊ शकतो.

Reference: MicromedexⒸs Care Notes System Online 2.0